Shri Krishna BahuudeshiyaSamajseviSanstha's, Osmanabad

COLLEGE OF EDUCATION (B.ED)

Osmanabad 413501

Criteria II: Teaching-learning and Evaluation

2.3.7: -: Teaching learning process nurtures creativity, innovativeness, intellectual and thinking skills, empathy, life skills etc. among students....

Documentary evidence in support of the claim

आरोग्य व योग शिक्षण

विभाग - अ

प्राथमिक

विभाग

प्रस्तावना

योग म्हणजे जोडणे. युज या संस्कृत धातुपासून योग हा शब्द तयार झाला असून त्याचा अर्थ जोडणे असा आहे. कोणत्याही दोन गोष्टी जोडणे या अर्थाने योग संयोग हे शब्द व्यवहारात वापरले जातात. परंतु व्यवहारातील या अर्थाचा व योगाचा काही फारसा संबंध नाही. योगात योग हा शब्द शरीराचे आरोग्य व आत्मोन्नती या संदर्भात विशिष्ट पारिभाषिक या अर्थाने वापरला आहे. शरीर, मन बुद्धी, भावना आणि आत्मा यांच्यामध्ये एकात्मता निर्माण करणे. एकात्मता म्हणजे विविधेतेतील एकता म्हणजे शारिरीक कृती, मानसिक विचार, बौद्धिक निर्णय या सकृत दर्शनी एकमेकांपेक्षा वेगळया असणाऱ्या हालचाली मध्ये एकसंधता, एकरुपता निर्माण करणे योगाच्या नियमित अभ्यासाने अशी जाणीव हळूहळू होत असते. एकात्मतेमुळे आपल्या भौतिक आणि आध्यात्मिक जीवनात एक प्रकारचे संतुलन निर्माण होते. महर्षिव्यास योगाचा अर्थ सांगतात. साधना करते वेळी आत्म्याला परमात्म्याशी जोडून अष्टांग योगाचे पालन करून समाधीचा आनंद घेणे योग होय. योग म्हणजे मानसिक विकासाची सर्वश्रेष्ठ अवस्था होय.

अभ्यास म्हणजे अभि + आस. अभि म्हणजे त्या विषयीचे भोवती आणि आस म्हणजे बसणे, बुद्धी स्थिर ठेवणे. योगाच्या अभ्यास म्हणजे अशा चित्तवृत्तीचा अभ्यास या अभ्यासाला पूरक व पोषक ठरावा म्हणून मूळ विषयाशी संबंधीत इतर विषयाच्या अभ्यास करावा लागतो. सत्याची कल्पना करण्यासाठी योगाभ्यास करावयाचा असतो. त्यासाठी सत्य जाणण्याची निखळ आणि प्रामाणिक ओढ असावी लागते. योगामुळे मनशांती, आनंद, आरोग्य या सारखे अनुषांगीक फायदे आपोआप मिळतात. योगमार्गातील समत्वं योग उच्यते या सुत्राचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भगवान श्री गौतम बुद्ध त्यांनी आपल्या जीवनात समतेला सर्वाधिक महत्त्व दिले.

उद्दिष्टे

योगासनाचे उद्दिष्टे आपल्याला खालीलप्रमाणे थोडक्यात व्यक्त करता येतील.

1) मानसिक शक्तिचा विकास होतो.

2) दैनंदिन ताणतणावापासून मुक्तता मिळते.

3) मानवी शरिराची योग वाढ व विकास होतो.

4) लोकांमध्ये जाग्रती निर्माण करणे

5) योगाभ्यासाद्वारे लोकांना / विदयार्थ्यांना उत्तम मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याची अनुभूती देणे.

6) योगाभ्यासात तणावपूर्ण परिस्थितीशी सामना करण्यासाठी लोकांमध्ये जाग्रती निर्माण करणे.

7) स्वास्थ्य वृद्धी विकास आणि शांतीचा संपूर्ण विश्वभर प्रसार करणे.

8) योगाभ्यासाद्वारे लोकांना प्रकृतीशी जोडणे.

9) विदयार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक उन्नती करणे.

10) यौगिक प्रक्रियेद्वारे आहार, विहार, विचार व व्यवहार संतुलित करून सुस्वास्थ्य, संपूर्ण सुखाची प्राप्ती करणे.

महत्त्व

1) शारीरिक आणि मानसिक लाभ मिळून शरीर अधिक लवचिक होण्यासाठी योगाचा फायदा होतो.

2) शरीर निरोगी, बळकट ठेवण्यासाठी योगाचे महत्त्व असून योगाभ्यास केल्याने प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत मिळते.

3) मधुमेहासारख्या रोगासाठीही योग फायदेशीर ठरते.

4) नियमित योगा केल्याने मधुमेहासारखे रोग आटोक्यात राहण्यास मदत मिळते.

5) ध्यानधारणा केल्याने मानसिक त्रासापासून सुटका मिळते आणि मन अधिक शांत होते.

6) पचनशक्तीचा त्रासही योगासनांमुळे निघून जातो आणि शरीर अधिक निरोगी राहते.

7) वजन कमी करण्यासाठी सर्वात जास्त फायदा योगाचा होतो.

8) योगामुळे तणाव येत नाही. व्यक्ती ताण तणावापासून मुक्त होतो.

9) रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

10) शरीराचा लवचिकपणा आणि शरीराची ठेवण सुधारते.

11) विद्यार्थ्यांनी योगासने केल्यास त्यांच्या अंतर्ज्ञानात वाढ होते.

सूर्यनमस्काराची कृती

१) नमस्कारासन अथवा दक्षासन -

सूर्याकडे तोंड करून उभे राहावे, शरीर ताठ ठेवावे दोन्ही हात छातीसमोर नमस्काराच्या स्थितीत ठेवून ॐ मित्राय नमः।। हा मंत्र म्हणावा.

२) पर्वतासन -

श्वास घेत दोन्ही हात वर उचलावेत कमरेपासून शरीर मागे झूकवा ॐ रवये नमः।। हा मंत्र म्हणावा.

3) हस्त पादासन -



श्वास बाहेर सोडा पुढे वाकून हाताचे पंजे जमिनीवर टेकवा पाय ताठ ठेवा, ॐ सुर्याय नमः ।। हा मंत्र म्हणावा.

4) हस्त दंडासन -



श्वास घेत दोन्ही तळहात जमिनीवर टेकवा. डावा पाय मागे न्या, छाती पुढे, मान मागे करून वर बघा मुडपलेल्या उजव्या पायावर बसा. उजवा गुडघा दोन्ही हाताच्या मध्ये ठेवावा व श्वास सोडा आणि ॐ भानवे नमः ।। हा मंत्र म्हणावा.

5) समकाय हस्त दंडासन –



श्वास घ्या व उजवा पाय मागे न्या. कुंबर वर उचलून शरीराची कमान तयार करा. शरीराचा तोल आणि वजन हाताचे पंजे व पायाच्या बोटावर राहील. डोके खाली व ॐ खगाय नमः।। हा मंत्र म्हणावा.

6) साष्टांग प्राणिपातासन / आष्टांग प्राणिपातासन –



श्वास सोडत शरीर जमिनीकडे न्या. हाताचे तळवे जमिनीला चिकटवा हात कोपऱ्यात मुडपा या अवस्थेत दोन हाताचे तळवे, दोन गुडघे, दोन पायाची बोटे छाती आणि डोके हे आठ अवयव जमिनीला चिकटलेले असतात व ॐ पुष्णो नमः।। हा मंत्र म्हणावा.

7) भुजंगासन -

दिर्घ श्वास घ्या. हाताचे पंजे जमिनीला टेकलेले हात ताठ करा. छातीवर करून डोके मागे करा आणि नजर आकाशाकडे व ॐ हिरण्यगर्भाय नमः ।। हा मंत्र म्हणावा.

8) उर्ध्वासन -



श्वास घ्या व उजवा पाय मागे न्या. कंबर वर उचलून शरीराची कमान तयार करा. शरीराचा तोल आणी वजन हाताचे पंजे व पायांच्या बोटांवर राहील. डोके खाली करा. पार्श्वभाग वर उचलेला असेल व ॐ मरीचये नमः ।। हा मंत्र म्हणावा.

Page No. | Date

९) हस्त दंडासन -



श्वास घेत दोन्ही तळहात जमिनीवर टेकवा. डावा पाय मागे न्या, छाती पुढे, उजवा पाय पुढे घ्या. मान मागे करून वर बघा. मुडपलेल्या उजव्या पायावर बसा. उजवा पाय दोन्ही हाताच्या मध्ये असेल आणि श्वास सोडा व ॐ आदित्याय नमः।। हा मंत्र म्हणावा.

१०) हस्त पादासन -



श्वास बाहेर सोडा पुढे वाकून हाताचे पंजे जमिनीवर टेकवा पाय ताठ ठेवा व ॐ सवित्रे नमः।। हा मंत्र म्हणावा.

(11) ऊर्ध्वासन –

श्वास घेत दोन्ही हात वर घ्यावेत कंबरेपासून शरीर मागे झुकवा. पाय सरळ व ताठ ठेवा व ॐ अर्काय नमः ।। हा मंत्र म्हणावा.

(12) नमस्कारासन –

सूर्याकडे तोंड करून उभे राहावे. शरीर ताठ ठेवावे. दोन्ही हात छातीसमोर नमस्काराच्या स्थितीत ठेवावे आणि ॐ भास्कराय नमः ।। हा मंत्र म्हणावा.

हस्तपादासन

Page No. | Date



कृती –

1) प्रथम सरळ ताठ उभे रहावे.
2) दोन्ही पाय एकमेकांना जुळवून ठेवावेत.
3) दोन्ही हात कानालगत डोक्याच्या वर खांद्याच्या सरळ रेषेत ताठ करावेत.
4) आता पायाच्या टाचा उचलाव्यात.
5) शरीराला टाचेपासून हातांपर्यंत जेवढे ताणता येईल तेवढे ताणावे.
6) आता पाय संपूर्ण जमिनीला टेकवावेत.
7) कंबरेतून वाकून हाताचे तळवे जमिनीला लावावेत.
8) असे करताना गुडघे वाकवू नयेत.
9) हात जमिनीला टेकवल्यानंतर डोके गुडघ्याला लावावे.
10) या स्थितीमध्ये कमीत कमी पन्नास सेकंद राहण्याचा प्रयास करावा.
11) त्यानंतर हळूहळू पूर्वस्थितीत यावे.
12) असे आसन एकाच वेळी तीन ते चार वेळा करावे.



कृती -

1) जमिनीवर पुढे पाय पसरुन सरळ ताठ, काटकोनात बसावे.
2) पसरलेले पाय एकमेकांना जुळवून घ्यावेत.
3) दोन्ही हात ताणून कानालगत वर करावेत.
4) आता हळूहळू कंबरेतून वाकत दोन्ही हातांनी पायांचे अंगठे पकडावेत.
5) परंतु खाली वाकताना श्वास बाहेर सोडावा व पाय गुडघ्यांत अजिबात वाकवू नयेत.
6) हाताचे कोपरे पायाच्या दोन्ही बाजूंना जमिनीवर टेकवावे व डोके गुडघ्याला लावावे.
7) अशा अवस्थेत कमीत कमी दीड मिनिट बसावे.
8) नंतर हळूहळू पायाचे पकडलेले अंगठे सोडून सरळ ताठ अवस्थेत पूर्वास्थितीत यावे.

भुजंगासन

Page No.	
Date	



कृती -

1) प्रथम जमिनीवर पालथे म्हणजेच पोटावर झोपावे.
2) दोन हात कोपऱ्यात वाकवुन हातांचे तळवे खांद्याजवळ ठ्यावेत.
3) डोके हळूहळू वर करून छताकडे बघावे.
4) याच वेळी कंबरेपासून शरीराचा भाग जेवढा जास्त उचलता येईल तेवढा उचलावा.
5) या अवस्थेत हातांच्या तळव्यांवर जोर दयावा व हात ताठ करावेत.
6) या अवस्थेत दोन ते तीन मिनिटे थांबण्याचा प्रयत्न करावा.
7) त्यानंतर हळूहळू पूर्वस्थितीमध्ये यावे.

सर्वांगासन

Page No.
Date



कृती –

1) प्रथम जमिनीवर पाठ ठेवून सरळ झोपावे.
2) पाय एकमेकांना जुळवूनच ठेवावे.
3) दोन्ही पाय एकत्रित घेऊन कंबरेजवळ वाकवून पोटाला काटकोन असे ताठ पाय करावेत.
4) आता दोन्ही हात कंबरेखाली घालून हे दोन्ही पाय हळूहळू आणखीन वर उचलून मानेला काटकोनात ताठ करावे.
5) असे करताना हाताने पायाला दिलेला आधार काढू नये.
6) या अवस्थेत कमीत कमी तीन सेकंद थांबावे.
7) आता दोन्ही पाय खाली आणून हात काढावेत व नंतर पाय सरळ करावेत.

मुद्रा कृती व फायदे

१) ज्ञानमुद्रा किंवा ध्यान मुद्रा –

कृती – अंगठा व तर्जनी ह्यांची टोके एकमेकाला स्पर्श करतील असे जोडून ठेवावेत व बाकीचे बोटे सरळ ठेवावीत.

फायदे – १) या मुद्रेमुळे एकाग्रता वाढते.

२) स्मरणशक्ती वाढते

३) नकारात्मक विचार कमी होतात.

४) डोके दुखी, अनिद्रा व तणाव दूर होतात.

२) वायु मुद्रा –

कृती – तर्जनीला वाकवून अंगठ्याने हळूच दाबा व बाकीचे बोटे सरळ ठेवावे.

फायदे – १) वायुमुद्रेच्या सरावाने रक्ताभिसरण चांगल्या प्रकारे होते.

२) सर्वप्रकारचे वायू रोग ठिक होतात.

३) संधीवात, पक्षाघात, गॅस बनने, कंपवात, गुडघे दुखी बरी होते.

3) शुन्य मुद्रा –



कृती – मधले बोट वाकवून अंगठयाने हलकेच दाब दया.
बाकीचे बोटे ताठ व सरळ ठेवावे.

फायदे – 1) या मुद्रेच्या नेहमी सराव केल्याने कान संबंधीचे अजार नाहीसे होतात.

2) थॉयरॉइडचे रोग बरे होतात.

3) हृदय रोग ठीक होतात.

4) हडाच्या अशक्त पणा नाहीसा होतो.

५) पृथ्वीमुद्रा –



कृती – अनामिका व अंगठा यांची टोके एकमेकाला स्पर्श करतील असे ठेवा आणि बाकीचे बोटे सरळ ठेवा.

फायदे – १) या मुद्रेच्या सरावाने वजन कमी होते.

२) पचन शक्ती वाढते.

३) व्हिटामीनची कमतरता दुर होते.

४) सात्विक गुणाच्या विकास होतो.

Page No.
Date

५) प्राणमुद्रा -



कृती- कनिष्ठा अनामिका व अंगठा यांची टोके एकमेकाला जोडून ठेवावीत आणि बाकीचे बोटे सरळ ठेवावीत.

फायदे- १) या मुद्रेच्या सरावाने दृष्टीदोष नाहीसे होतात.

२) रोग प्रतिकारक शक्ती वाढते.

३) तहान व भुकेवर नियंत्रण येते.

६) अपान मुद्रा –

कृती – अनामिका, मध्यमा व अंगठा याची टोके एकमेकाला जोडून ठेवावीत व बाकीचे बोटे सरळ ठेवावीत.

फायदे – 1) या मुद्रेच्या सरावाने बद्धकोष्ठता, वायूविकार, मधुमेह, मुळव्याध इत्यादी विकार नाहीसे होतात.

2) पोटाच्या समस्या दूर होतात.

3) अपचन, मलावरोध या सारख्या समस्या दूर होतात व शरीर निरोगी राहते.

प्रस्तावना

शैक्षणिक साहित्य

दैनंदिन अध्यापनात शैक्षणिक साहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विषयानुसार प्रत्येक घटकांचे व त्यामधील लहान लहान तत्वांचे संबोध स्पष्ट होण्यासाठी शैक्षणिक साहित्य महत्त्वाचे ठरते. विद्यार्थी ८५% ज्ञान डोळ्याने ग्रहण करतो. त्यानुसार शैक्षणिक साहित्य दोन बाजुने कार्य करते. एक म्हणजे विद्यार्थी प्रत्यक्ष पाहतो आणि दुसरा म्हणजे विद्यार्थी प्रत्यक्ष हाताळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे संबोध स्पष्ट होऊन तो घटक अधिक चांगल्या तऱ्हेने समजतो. तर आपल्याला असे म्हणता येईल की,

I hear, I forget
I see , I remember
I do , I understand

अध्ययन, अध्यापन या प्रक्रिया एकमेकांशी निगडित आहेत. यशस्वी अध्यापन म्हणजे विद्यार्थ्याला अधिक ज्ञान देणे आणि त्यांची आकलनशक्ती वाढविणे. काही नवीन संकल्पनाचे दृढीकरण करणे होय. विद्यार्थी शिकला यांची साक्ष त्यांच्या वर्तनात दिसते. विद्यार्थ्यांने ऐकल्यास तो विसरून जातो, पाहिल्यास ते लक्षात ठेवतो आणि प्रत्येक केल्यास समजून घेतो. म्हणून अध्ययन, अध्यापन क्रिया यशस्वी होण्यासाठी शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा. शैक्षणिक साहित्याचा वापर केल्याने अध्यापन अतिशय प्रभावशाली होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढते व अध्यापनामधील सातत्य टिकून रहते.

शैक्षणिक साहित्याचे प्रकार

दृक

प्रक्षेपित
- स्लाईड प्रोजेक्टर
- एपिडायस्कोप
- प्रोजेक्शन - मायक्रोस्कोप

अप्रक्षेपित
1) तक्ते
2) नकाशे
3) भित्तिपत्रके
4) घडीचित्रे
5) कोलाज
6) विज्ञान उपकरणे
7) फलक
(कल्पफलक, काचफलक, चुंबकफलक)
8) फ्लॅशकार्ड
9) व्यंगचित्रे
10) आकृत्या
11) आलेख

श्राव्य
1) रेडिओ
2) टेपरेकॉर्डर
3) स्पीकर
4) साउंड
5) कॅसेट्स

दृक-श्राव्य
1) चित्रपट
2) दूरदर्शन
3) कळसूत्री-बाहुल्या
4) व्हिडीओ
5) चलचित्रपट

इलेक्ट्रॉनिक
1) संगणक
2) इंटरनेट

एडगर डेल यांचा अनुभव शंकु



प्रकाशाचे परावर्तन (शै. साहित्य)



पेरिस्कोप –



कंपासपेटीतील साधनांची ओळख

1) मोजपट्टी

2) कंपास

3) कर्कटक



4) गुण्या





कोनमापक



प्रत्यक्ष कार्यवाही

अ) पोस्टाचे पाकीट तयार करणे.

साहित्य :- कात्री, ओडरबर, डिंक, ब्राऊन पेपर.

कृती :- १) प्रथम ब्राऊन पेपर घेऊन २०×३२ सेमी चा आयत काढला.

२) त्या आयताच्या लांबीचे ९ सेमी व १४ सेमी असे भाग पाडले. व रुंदीचे २० सेमी चे ५.५ सेमी चे भाग पाडले. कृतीत दाखवल्याप्रमाणे सांधले.

३) १४ सेमी व ९ सेमी मापाच्या आयतात बाहेरील टोकापासून ९ सेमी आयतामध्ये टाकलेल्या भागाबरोबर सांधले.

४) आयताच्या तिरप्या रेषेने दाखविलेला भाग कापून काढला.

५) ठळक दाखवलेला भाग आतील भागास मुडपून घेतला. व तो भाग डिंकाने चिटकवला.

६) अशाप्रकारे पोस्टाचे पाकिट तयार झाले.



अ) मुळ रंग



ए) दुय्यम रंग



ऐ) रंगसंगती



रंगचक्र



ओ) संदेशात्मक चित्र

पर्यावरण वाचवा, जिवण वाचवा.

औ) शैक्षणिक चित्र

" विवेक ज्ञान अमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण "

डॉ. म. पं. सुरवसे

श्रीकृष्ण बहुउद्देशिय समाजसेवी संस्था संचलित,

कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद

शैक्षणिक वर्ष - २०२२-२३

सांस्कृतिक उपक्रम

प्रशिक्षणार्थीचे नाव :- काळे ज्योती गुणवंत

हजेरी क्रमांक :- 12

मार्गदर्शक :- प्रा. खुणे आर. बी सर

" विवेक ज्ञान अमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण "

डॉ. म. पं. सुरवसे

श्रीकृष्ण बहुउदेशिय समाजसेवी संस्था संचलित,

कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद

शैक्षणिक वर्ष - २०२२-२३

नाट्य कला व शिक्षण

प्रशिक्षणार्थीचे नाव :- निकम अभिलाषा अनिल

हजेरी क्रमांक :- 06

मार्गदर्शक :- प्रा. डॉ. पवार डी. डी. सर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

''विवेक, ज्ञानअमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण '' प्रा. डॉ. म.पं. सुरवसे

श्रीकृष्ण बहुउद्देशिय समाजसेवी संस्था, उस्मानाबाद संचलित.,

ता.जि. उस्मानाबाद

कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद

प्रा.डॉ.म.पं.सुरवसे
(एम.ए.,एम.एड.,एम.फिल.,पीएच.डी.)
माजी एज्यु.डीन

Principal
Shrikrishna B.S.S
College of Education,Osmanabad

मानसशास्त्रीय प्रयोग वही

विद्यार्थी शिक्षकाचे नांव हाजगुडे भाग्यश्री लक्ष्मण

हजेरी क्रमांक 29

" विवेक ज्ञान अमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण "

डॉ. म. पं. सुरवसे

श्रीकृष्ण बहुउदेशिय समाजसेवी संस्था संचलित,

कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद

शैक्षणिक वर्ष - २०२२-२३

सांस्कृतिक उपक्रम

प्रशिक्षणार्थीचे नाव :- हाजगुडे भाग्यश्री लक्ष्मण

हजेरी क्रमांक :- 29

मार्गदर्शक :- प्रा. खुने सर

विवेक, ज्ञानअमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण-

प्रा. डॉ. म. पं. सुरवसे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद अंतर्गत

श्री कृष्ण बहुउद्देशीय समाजसेवी संस्था उस्मानाबाद संचलित,

कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

शैक्षणिक वर्ष - २०२०-२१

नाट्य, कला व शिक्षण

Shrikrishna B.S.S College of Edu Osmanabad

प्रशिक्षणार्थी :- कु. कापसे संध्या बिभिषण.

हजेरी क्रमांक :- 48

मार्गदर्शक :- प्रा. डॉ. पवार डी.डी. सर

१०

विवेक, ज्ञानअमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण-

प्रा. डॉ. म. पं. सुरवसे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद अंतर्गत

श्री कृष्ण बहुउद्देशीय समाजसेवी संस्था उस्मानाबाद संचलित,

कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

शैक्षणिक वर्ष - २०२०-२१

स्व ची ओळख

प्रशिक्षणार्थी :- कु गीता व्यंकटराव कोळी

हजेरी क्रमांक :- 16

मार्गदर्शक :- ....

Unit Plan Template

Note: Type in the gray areas. Click on any descriptive text, then type your own.

Unit Author	
First and Last Name	सुतार सुप्रिया शिवाजी
Author's E-mail Address	----------------------
College Name	श्रीकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय उस्मानाबाद
Address	बार्शी नाका उस्मानाबाद
Phone	-----------------------
Course	Intel Tech Pre Service Program

Unit Overview	
Unit Plan Title	सामाजिक पर्यावरणाचा ऱ्हास एक समस्या
Curriculum-Framing Questions	
Essential Question	• सामाजिक स्वास्थ्य म्हणजे काय? • सामाजिक स्वास्थ्य व पर्यावरण यांच्यातील संबंध स्पष्ट करा.
Unit Questions	• सामाजिक पर्यावरण बिघडण्याची कारणे सांगा? • जलाशयाचे पाण्ी दूषित का होते ?
Content Questions	• दूषित पर्यावरणाचे परिणाम सांगा. • गावाचे सामाजिक पर्यावरण आरोग्यदायी राखण्यासाठी कोणती काळजी घ्यावी ?

Unit Summary

तुम्ही स्वत: तुमचे कुटुंब किंवा समाजाचे घटक केवळ निरोगी असून भागग नाही. त्याचबरोबर सर्वजण समाधनी असायला हवेत. आजूबाजूला केरकचरा पसरलेला आहे, गोंगाट आहे अशा ठिकाणी राहायला पसंत करणार नाही. गावात पाण्याचा तुटवडा असला तर स्वच्छता ठेवणे कठीण होते.

गावात पुरेसे पाण्ी उपलब्ध आहे, परिसर स्वच्छ आहे. मनोरंजनासाठी बागबगिचे आहेत.

©2004 Intel Corporation. All Rights Reserved